हर्षज पाटकर- इरावती पाटकर

# क्लिक -2



# क्लिक-2

हर्षज पाटकर
इरावती पाटकर

ई साहित्य प्रतिष्ठान

पुस्तकाचे नांव  : क्लिक-2

छायाचित्रकार : हर्षज पाटकर

लेखन, शब्दांकन : हर्षज पाटकर, इरावती पाटकर

iraharsh@gmail.com

Website:- www.touchthroughlens.com

https://www.facebook.com/Touchthroughlens




या पुस्तकातील छायाचित्रांचे व  लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान <esahity@gmail.com>
प्रकाशन : ३ नोव्हेंबर २०१४
©esahity Pratishthan® 2014
www.esahity.com

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.


© Harshaj Patkar

# एका दुपारी एका बाकासाठी

काही फोटो तुमच्या लाडक्या यादीत बसवलेले असतात. ते तुम्हाला का आवडतात त्यासाठी काही विशिष्ठ कारण नसतं बुवा. म्हणजे एखाद्या फोटोशी तुमची एखादी आठवण निगडीत असेल मग ती सुखाची असो, दुःखाची असो किंवा मग नुसतीच कोरडी असो. तुम्हाला प्रत्येक  वेळी तो फोटो समोर येतो तेव्हा त्याबरोबरचे जगलेले क्षण घेऊनच येतो. आणि मग आठवणींच्या लड्या हळुवार उलगडत जातात.

असाच आजचा फोटो माझ्या खास आवडीचा. ऑटोम म्हणजे शरद ऋतूतील (हिवाळ्याची सुरुवात) ती सोनेरी दुपार. निसर्गाने कात टाकायला घेतलेली. सोनेरी कांती आणि वातावरणात पसरत गेलेला थंडावा. या गारव्यातलं एक गार्डन. आजूबाजूच्या धावत्या आयुष्याला दिमाखात पाठ फिरवत... स्वतःचाच शिष्ठपणा जपत शहराच्या मधोमध... शांत... एकाकी... तरीही बोलकं. किती पवित्र, शांत जागा आहे ही. झाडांच्या गर्दीनी भरलेलं हे  गार्डन आणि  त्यातही अखंड चालू असलेली पानगळती. रंगीत सुंदर

पानगळती... त्यात एका झाडाखाली बसलेला तो एक बाकडा.... शांत... तपस्वी. झाडांच्या मधूनच येणारा तो सोनेरी प्रकाश... उजळून टाकतोय. त्या गार्डन मधील प्रत्येक दिशा स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करत. माझ्या मनात एक तस्वीर उभी रहात होती. आणि अगदी तश्शीच ही आली आहे.

आता तांत्रिक बाबींचा विचार करता मला हा फोटो अगदी पहिल्याच क्लिक मध्ये मिळाला नसला किंवा अगदी परफेक्ट नसला तरी छान आला आहे. पण सगळं एका क्लिक मध्ये जुळून वगैरे आलं असं काही नाही बरे का! म्हणजे आपल्याला बरेचदा असंच वाटतं की मी गेलो आणि मला एका फटक्यात हवा तसा फोटो सापडला. एक बेस्ट फोटो मिळणं म्हणजे ' तो आला त्यानं पाहिलं आणि त्यानं जिंकून घेतलं.' अश्या प्रकारच्या कागदी संवादाप्रमाणे सोपं नाही. कधी कधी फोटोत एका फोटो ग्राफरने काढलेली इमेज आपण जशीच्या तशी उतरवू शकत नाही. म्हणून तर ताज महाल सारख्या जागतिक दर्जाच्या

कलाकृतीवर आजही वेगवेगळे प्रयोग होताच आहेत की, कधी कुंचल्यातून तर कधी छायाचित्रातून.... तरीही प्रत्येकाला भावलेली आणि त्यातून निर्मिलेली कलाकृती ही वेगवेगळीच ठरतेय. का बरं असं व्हावं? ताजमहाल तर तोच एकाच जागी उभा तरीही फोटोतून दिसणारं त्याच रूप मात्र वेगवेगळं.

हे असं म्हणजे नेमकं काय... भला मेरा फोटो उसके फोटोसे अलग क्यूं? ' हेच नेमकं कारण शोधायचा प्रयत्न करायचाय आपल्याला. आणि ह्या भागात आपण चर्चा करणार आहोत ' फोटोग्राफीक  ॲंगल' वर आणि हा ॲंगल म्हणजे नेमकं आहे तरी काय? लहानपणी आपण सगळयांनीच आरशांचं प्रतिबिंब खेळ खेळलाच असेल... काय बरं नाव होतं त्या खेळाचं... नाही आठवत बुवा... किंबहुना नाव नसावंच त्याला... लहानपणी आपल्याला 'नाव ठेवण्याची ' कला कुठे अवगत असते नाहीतरी..... जाऊदे.. नाव तितकंसं महत्वाचंही नाहीये. त्यातल्या गमतीसारखं.... हातात काचेचा तुकडा किंवा आरसा घेऊन  लाईट त्यात

पकडत त्याचा कवडसा पडायचा. जरा चुकलं तरी तो कवडसा गायब व्हायचा.  आता तो कवडसा बरोब्बर खुबीने पकडणं म्हणजे 'अॅंगल'. आपल्याला सगळयांनाच लहानपणी जमलेलं फोटोचं पहिलं टेक्निक... काहींनी  तरुणपणीही आपल्या बाईकच्या मिररमधून असे अॅंगल ट्रॅंगल पकडले असतीलच की... पण ते सिक्रेट... सांगायचं नाही.

असो, तर फोटोग्राफीक अॅंगल म्हणजे विशिष्ट पद्धतीने केलेली दृश्यांची पकड, असं आपण थोडक्यात म्हणूया. फोटोग्राफर ने निवडलेला एक असा दृष्टीकोन, ज्यातून प्रेक्षकांना रूप बदलून दिसलेली कलाकृती.

आता वरच्या फोटोतील अॅंगल मधून मला माझ्या प्रेक्षकांना असंच काहीसं दाखवायचा प्रयत्न करायचाय. म्हणजे एक विशाल पसरलेला वृक्ष... शरदाच्या रंगात न्हाऊन निघालेला. एक छोट्याश्या बाकड्याला सावली आणि ऊब देणारा आणि ही पानगळ

नसून प्रत्येक पांथस्थ, जो ह्या बाकड्यावर काही क्षणासाठी टेकला असेल, त्यांच्या आठवणीची  उलगडत गेलेली पाने... मोकळी स्वैर विखुरलेली.... काही क्षण ह्या बाकड्यावर बसून आयुष्याचा जमाखर्च मोजताना. कधी भरून येतांना... कधी हलकं होतांना....

खरं तर मेलबर्न  शहरात मी पहिल्यांदाच जात होतो. त्यातून ती सहकुटुंब ट्रीप म्हणजे परत त्यात फिरण्याच्या मर्यादा आल्याच. मेलबर्न हे ऑस्ट्रेलिया मधील एक जुनं वसलेलं शहर. किमान २०० वर्षाहून जुनं असेल. कॅप्टन कूक जेव्हा देश शोधायला निघाला तेव्हा त्यानं मेलबर्नमध्ये गांवाबाहेर त्याचं एक छोटंसं घर बांधलं आणि आता ते शहराच्या मध्यवर्ती भागात येतं. खूप सुंदर वास्तुशिल्पाचा नमुना ह्या  शहरात पाहायला मिळतो.

मी माझे फोटोग्राफी प्रयोग करत फिरत  होतो. न जाणो कधी डोळ्याला न भावलेला देखावा तुमच्या फोटोत मात्र काही वेगळाच चमकून ही जाऊ शकतो. आणि

असंही होतं बरेचदा की मी एखाद्या वेगळ्याच फोटोच्या शोधार्थ निघालेला असतो आणि मला काही संबंध नसताना कुठला दुसराच फोटो मिळून जातो.

आता फोटो क्र. २ बघा.



ह्यामध्ये ही जागा स्पष्ट दिसतेय जिथे झाडाखाली एक छोटासा बाकडा आहे परंतु हा फोटो मी जसाच्या तसा काढला तर ह्यातून तुम्हाला काय कळू

शकेल? मला नक्की काय दाखवायचंय? झाड, रस्त्यावरच्या  गाड्या, की आणखी काय?

पण असंच थोडा पुढे गेल्यावर माझ्या दृष्टीस पडलं एक मोठं पिवळं धम्मक झाड, अक्राळ, विक्राळ पसरत गेलेलं, आणि संपूर्ण परिसराला एक ठळक शोभा आणत दिमाखात उभं असलेलं. आणि त्याच्या पायथ्याशी असलेला तो छोटासा बाकडा. दुर्लक्षित तरीही लक्षवेधी... ह्या दोन शब्दांतच किती विरोधाभास आहे ना?.. पण मला असंच काहीसं भासलं त्या एकूण दृश्याला बघून.

त्या बाकड्याकडे एक गाठोडं असेल भरलेलं आठवणींचं... असं वाटून  गेलं. प्रत्येक येणारा पांथस्थ, तरुण असो वा जर्जर. काही क्षण तरी विसावत असेलच की... काय काय अनुभव असतील ह्या बाकड्याच्या गाठोडीत... कोणीतरी त्यावर बसून प्रेमाचे रंग उधळलेले असतील. आणि कोणीतरी त्यावर अलगद झेलले असतील, पदरात ते रंग.. जपून

ठेवण्यासाठी... तर कोणी तरी आयुष्याचा जीवनपट  पाहिला असेल.. झरझर सरकत गेलेला. किंवा एखाद लहानगं नुकताच चालायला लागलेलं.... आजुबाजूची पानं त्या बाकड्यावर गोळा करून लुटूपुटूची  भातुकली रंगवत बसलेलं... एखादा माणूस येऊन काही क्षण पहुड्लाही असेलच की... तर कधी पावसाने चिंब करून टाकलं असेल त्या बाकड्याला नाहीतर थंडीने गारठूनही टाकलं असेल कईकदा ...

तर मला माझ्या फोटोसाठी काहीतरी गवसलं होतं माझ्या २ तासाच्या तब्बल शोधानंतर. मला त्या फ़ोटोतून माझ्या या सर्व भावना प्रेक्षकापर्यंत पोहोचवायच्या होत्या.

आता हेच बघाना. फोटो क्र. २ मध्ये बाकडा दिसतही नाहीये. आणि फोटोमध्ये ही काही विशेष जाणवत नाहीये. आता मी जो ॲंगल घेऊन फोटो काढण्याचा प्रयत्न केलाय त्यात एक हिरवागार गार्डन तर आलंय पण फोटो एक सरळ उंचीवरून घेतला गेलाय.

आणि हा फोटो घेण्यासाठी मी वाईड अँगल १८ एम एम, आय एस ओ ८०० aperture एफ/९,०, shutter १/२५० ठेवलेला आहे.

मग अजून जवळ फिरत जाताना मला त्या गार्डन मधील विशाल सुंदर हिरवळ दिसत होती. तरीही कुठलाही अँगल एक सुंदर देखावा पकडू शकत नव्हता. त्या बाकड्या जवळच्या झाडा जवळ जाण्याआधी मला काहीसा अश्या प्रकारचा



अँगल मिळाला जो मी फोटो ३ मध्ये घ्यायचा प्रयत्न केलाय. दोन गर्द झाडांच्या मधोमध बाकडा आणि पिवळे झाड  पकडण्याचा प्रयत्न केला. तरीही ' ये बात' म्हणण्या सारखा काही जमत नव्हतं.

परत मला तो सरळसोट उभ राहून घेतलेला त्यामुळे मला हवा तसा अँगल पकडता आला नव्हता. मी जर तोच फोटो बसून घेतला असता तर कदाचित तो जास्त प्रभावीपणे घेतला गेला असता. आता फोटो क्र, ४ चा विचार करता त्यामध्ये बरेच डोळ्याला खटकणारे अडथळे आले आहेत.  एक लॅंप



पोस्ट बाकड्याच्या समोरच आलाय. उजवीकडे कचऱ्याचे मोठे डबे, बाजूला पार्किंग लॉट आहे. आता मी झूम करून झाड आणि बाकडा घ्यायचा प्रयत्न केला तर झूम केल्यानी झाड नीट capture होत नाही. त्याचा काही भाग कट होऊन फ्रेमला मजा येत नाही. आता हा फोटो घेताना मी जास्त वाईड ॲंगल न घेता फक्त ३९ एम एम आय एस ओ ८०० aperture एफ/९.० आणि shutter १ /२५० ठेवण्याचा प्रयत्न केलाय.

परंतु तरीही मला हवा तसा बाकडा अन झाडाचा संबंध माझ्या फोटोत जोडता येत नव्हता. मग मी ठरवलं कि आपण बाकडा आणि झाडाचा ठराविक भाग फोटोत पकडून बघूया. कदाचित ते जास्त चांगलं दिसू शकेल. त्याचं उदाहरण म्हणजे खालचा फोटो क्र. ५ हा मुळ फोटो आहे जेव्हा मी घेतला होता आणि त्यावर काही संस्कार करून फाईनल इमेज बाहेर आली. आता हा फोटो घेण्या करता ९८ एम एम आय एस ओ ८०० aperture एफ/९.० आणि shutter १ /४०० मी वापरलाय. आता फोटो तरी मनासारखा जमला

होता. तरी त्यात काही distractions अजूनही होते. तरी त्यात अजून एक बाकडा लांब



झाडाखाली आहे, आणि बरोब्बर फोटोच्या वेळी काही माणसं चालत जाताना बाकड्या समोर आल्याने फोटो थोडा खराब होत होता. मग मी पुन्हा तीच फ्रेम पकडून लोकं मागे जाण्याची वाट पहिली आणि फोटो क्लिक केला.

पण तरीही फक्त माणसं जाऊन फोटो पूर्ण होत नव्हता. तर त्यातील अजून एक बाकडा आणि पार्किंग लेन दिसताच होती. त्यामुळे फोटो पोस्ट प्रोडक्शन करताना मी थोडा क्रोप केला आणि त्यामुळे बाकडा, झाड, आणि पानगळ जास्त ठळक झाले. पण प्रत्यक्ष डोळयांना दिसणारा झाडांच्या पानांचा रंग हा सोनेरी पिवळसरपणा कडे झुकलेला होता, कारण ते मे महिन्याचे दिवस होते. आणि ऑस्ट्रेलिया मध्ये हिवाळयाची सुरुवात असते. मग अश्या वेळी कशाने बरं पिवळसर दिसणारी पान फोटोत मात्र तशी दिसत नव्हती? त्याला कारण होता ' white balance  setting '. मी white balance  setting  auto mode वर ठेवल्यामुळे ते फोटो मध्ये गडद दिसत होते आणि त्यामुळेच पोस्ट प्रोडकशनच्या वेळी मला फोटोच्या रंगत बदल करावे लागले.

त्या मुळेच मला हवा असलेला पानांचा सोनेरी रंग परत मिळाला. आणि झाडाचा बुंधा आणि बाकडा थोडा गडद केल्याने एकूणच फोटोला उभारी आली. तसाच फोटो क्र. ६



बऱ्यापैकी पूर्ण झालेला असूनही बाकड्या समोर एक काठी किंवा दांडा दिसतोय. आता तो बराच लहान असूनही फोटो जर बसून काढला तर ह्या फोटोचं रूप बदललं असतं. कि तसंच राहिलं असतं?

आता केवळ बसून, उभा राहून किंवा पूर्ण आडवं पडून फोटो काढायचा प्रयत्न केला तर प्रत्येक वेळी फोटोचा ॲंगल बदलत जातो. म्हणजे असं कि दृश्य तेच असतं ते बदलत नसतं, परंतु ॲंगल

बदलल्याने फोटोची फ्रेम मात्र बदलते. म्हणजे कधी बसून फोटो काढला तर समोर दिसणारं झाड जास्तच उंच वाटत किंवा उभं राहून फोटो काढल्यास तेच झाड एकदम बुटक दिसत. त्यामुळे दृश्य हे तेच असतं फक्त अँगल बदलून तुम्ही फोटो जास्त आकर्षक करू शकता.

आता काही बसून घेतलेले फोटोचे अँगल आणि त्या नुसार काढलेले फोटो पाहूया. आता हा फोटो पहा. मी अतिशय खाली बसून आणि बाकड्या जवळून हा फोटो काढलाय



त्यात बाकडा मोठा आणि समोरचा झाड तुलनेन खुजं दिसतंय. बरं, खरं झाड हे चांगलंच ८-१० फुट उंच आहे. आणि बाकड्या पासून फारसं लांबही नाहीये. परंतु बाकड्या जवळून फोटो काढताना धरलेल्या अँगल मुळे फोटोत छोटा बाकडा हा जास्त लक्षवेधी ठरतो. हे आहे फक्त अँगल कसब. आता ह्या फोटोसाठी १८ एम एम

अँगल वाईड आय एस ओ २०० aperture एफ /११.० आणि shutter १/२०० वापरला असून कॅमेरा बाकड्या च्या समान रेषेत असल्याने आणि बाकड्या जवळून फोटो काढल्यानी बाकडा हा झाडापेक्षा मोठा वाटतो.



आता हा दुसरा फोटो बघा. दृश्य तेच. तोच बाकडा तेच झाड, फक्त अँगल बदलला आणि फोटोत बदल केला. आता मी बाकड्या पासून थोडा दूर उभं राहून कॅमेरा सेटिंग ९८ एम एम वाईड, आय एस ओ २०० aperture ३.५ आणि shutter १/१००० ठेऊन हा फोटो काढलाय.

आधीच्या फोटोप्रमाणे खाली बसूनच हाही फोटो काढलाय. परंतु आता मी बाकड्या पासून थोडा दूर सरकलोय. आता फोटोतला फरक पहा.  ह्यात बाकडा थोडा तितक्या ठळकपणे न दिसता  बाकडा, झाड, आणि बाकीचा निसर्ग ही जाणवतोय.

त्यामुळे फोटोच्या विविधतेमध्ये अँगल सर्वात जास्त महत्त्वाचा भाग ठरतो. आता अजूनही एक एक वाईड अँगल आणि लो अँगल (गुडघ्यावर बसून ) ने काढलेल्या फोटो ची उदाहरणं पाहूया.

वाईड अँगल फोटो : ह्या फोटो साठी असलेलं कॅमेरा परिमाण आहे. १८ एम एम, आए एस ओ २०० aperture  एफ /५.६ आणि shutter  १/१६०. आता हेच दृश्य पुढच्या फोटोत वेगळा फरक आणतंय



High angle

Low angle



Wide angle



आता ह्या फोटो साठी वापरलेलं परिमाण जरी तेच असलं तरीही केवळ अँगल खाली बसून घेतल्याने बेंच जास्त मोठा वाटतो. आता एव्हाना तुम्हालाही हे लक्षात आलाच असेल कि मी बेंचच्या जवळून फोटो काढल्याने त्याचं आकार मोठा दिसतोय. आणि मी त्याच्या वरचा भाग फोटोत घेऊ शकलेलो नाही. कारण मी लो अँगल फ्रेम ठेवलीय. तसेच आपण हेच परिमाण माणसांच्या फोटोग्राफीसाठी वापरून माणसांची स्थूलता, उंची कमी जास्त दाखवू शकतो.


**हाय अँगल फोटो**

ह्यातही कॅमेरा परिमाण आधीच्या फोटोचेच ठेवलेले आहे. फक्त अँगल मध्ये थोडा फरक आहे. हा फोटो बेंच जवळूनच फक्त उंचावरून घेतलाय. तसे बघता हे तीनही फोटो आपल्याला विशेष लक्षवेधी असं काही देत नाहीत. पण तरीही हाय अँगल काहीतरी पोहोचवण्याचा प्रयत्न करतो.

मला वाटतं आत्तापर्यंत हि अँगलची किमया लक्षात आलीच असेल तुमच्या. फोटो काढताना वेगवेगळे अँगल वापरून काढलेला फोटो हा विविधता आणू शकतो. आता डिजीटल फोटोग्राफीच्या दुनियेत तुम्ही हजारो फोटो काढून हे प्रयोग करूनही शकता.

आता तुम्हाला वाटेल कि जर माझ्या कॅमेरात झूम ची इतकी चांगली सोय असताना मी पुढे जाऊन, खाली बसून, वाकून अँगलनेच फोटो का काढू? झूम असताना हे कष्ट का घ्यावे? पण त्यासाठी थोडं थांबावं लागेल. झूम वापरण्याची आणि न वापरण्याची मजा तुम्हाला पुढच्या भागात उलगडून दाखवतोच.

वाट पाहुया क्लिक ३ ची...


© Harshaj Patkar

# छायाचित्रकार लेखकांना आवाहन

फ़ोटोग्राफ़ी ही खुप कॉंप्लेक्स कला आहे. एखाद्या चांगल्या फ़ोटोकडे डोळसपणे कसे बघावे हे समजून घ्यावे लागते. आता तर प्रत्येकच जण मोबाईलवरून फ़ोटो काढतो. पण प्रोफ़ेशनल ते प्रोफ़ेशनल. त्याची डेप्थ समजून घेता यावी यासाठी आपल्याकडुन मदत हवी. आपले निवडक फ़ोटो व त्यावरचे राइट अप आमच्याकडे पाठवा. त्यावर रितसर पुस्तक बनवून आपल्या अधिकारांसह ते प्रसिद्ध करू.

वाचक मित्रांना आवाहन. पुस्तक कसं वाटलं ते कळवा. तुमचे अभिप्राय लाख मोलाचे आहेत.

धन्यवाद<br>
आपले नम्र<br>
टीम ई साहित्य

